# राष्ट्र + गीत = राष्ट्रगीत

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - महाराष्ट्र टाईम्स वर्तमानपत्र, संपा. गोविंद तळवलकर, मुंबई, ०५ एप्रिल, २०००)

प्रश्न असा आहे की, राष्ट्र + गीत = राष्ट्रगीत? असे समीकरण मांडता येते का? असे समीकरण गरजेचे आहे का?

मुळात राष्ट्रवाद अणि रोमँटिसिझम इ. कल्पना आपल्या नाहीत. पाश्चिमात्य आणि खरे म्हणजे ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतावर केलेल्या कुरघोडीचा प्रतिवाद म्हणून राष्ट्रवाद निर्माण झाला. राजकीय वर्चस्वाखालच्या प्रजेला पूर्णत: आपल्या कह्यात आणण्याकरिता ब्रिटिश राज्यकर्ते एका आक्रमक राष्ट्रवादाचा पुरस्कार करत होते. जशास तसे, टोल्यास प्रतिटोला या न्यायाने ब्रिटिशांच्या आक्रमक भूमिकेला उत्तर देण्याकरिता भारतीय राष्ट्रवाद धुमसू लागला. जीवनाच्या विविध क्षेत्रांत राष्ट्रवादी पडसाद उमटू लागले. संगीताचा यास अपवाद कसा असेल? थोडक्यात सांगायचे तर राष्ट्रवाद आणि संगीत यांच्या परस्परसंबंधांचा एक परिणाम म्हणजे राष्ट्रगीताचा उदय, प्रसार व वापर वगैरे होत. राष्ट्रवाद या कल्पनेला - आणि म्हणून राष्ट्रगीत या कल्पनेला - नव्याने छेद जात असतांना सारी घडामोड नव्याने तपासायला काय हरकत? वंदे मातरम् चा उदय, प्रसार व वापर ही एक सांस्कृतिक घटना आहे. आणि म्हणून तिचा विचार व्यापक चौकटीत करायला हवा. सांस्कृतिक घटना एकट्या-दुकट्या व्यक्तीला सहसा घडवता येत नाहीत - नैमित्तिक कारण एखादी व्यक्ती असली तरी!

ब्रिटिश राष्ट्रवादाच्या कार्यपध्दतीचा एक रोख असा की ढोबळ चिन्हे निर्माण करून त्यांच्या आधारे प्रजेला एकत्र बांधायचे व अधीन ठेवायचे. ध्वज, गीत, घोषणा, नॅशनल अँथम (राष्ट्रगीत) या बाबींकडे या रोखाने पाहिले पाहिजे.

**'गॉड सेव द क्वीन'**

१८१३ मध्ये अशी घोषणा झाली की ईस्ट इंडिया कंपनी या ब्रिटिशांच्या व्यापारी अवताराने ब्रिटीश राजसत्तेच्या अंमलाखाली कारभार करावा. हे कंपनी सरकार १८३३ पासून ब्रिटिश राजसत्तेचा केवळ प्रशासकीय विभाग बनले. पुढे १८५७ चे अयशस्वी स्वातंत्र्ययुध्द, १८५८ मध्ये राणीच्या अंमलाचा जाहीरनामा वगैरे घडामोडी होऊन ब्रिटिश राजसत्तेचे पूर्ण प्रभुत्व प्रस्थपित झाले. याचेच जणू फलित म्हणजे १८७५ मध्ये प्रिन्स ऑफ वेल्स भारताच्या दौऱ्यावर आला. त्याच्या स्वागतासाठी अहमहमिका लागली. त्याला रत्नादिकांचे नजराणे दिले गेले. राणीपुत्राला आपल्या अंतर्गृहांत नेऊन, आरती ओवाळून, शंख फुंकून त्याचे एखाद्या लाडक्या नवऱ्यामुलासारखे स्वागत केले गेले. अर्थातच यावर टीका झाली - इतकेच नाही तर प्रहसनात्मक नाटक लिहून व सादर करून टवाळीही झाली! ('गजानंदो आरो युबराज' हे त्या नाटकाचे नाव). बंकीमांना वंदे मातरम् याच साली स्फुरले. अखेर १८७७ पासून राणी विक्टोरिआच्या साम्राज्यातले प्रजाजन म्हणून भारतीयांची गणना होऊ लागली. भारतातील मोगल अंमलाची अधिकृत अखेर झाली. आपल्या साम्राज्यातील ही पौर्वात्य प्रजा आपल्याकडे फारशा आवडीने पाहत नाही आणि तसे होणे गरजेचे आहे हे जाणवायला चाणाक्ष ब्रिटिशांना फार काळ लागला नाही. यातूनच एक कल्पना निघाली की तमसातीरी गायल्या जाणाऱ्या ब्रिटिश राष्ट्रगीताची - गॉड सेव द क्वीन - ची दीक्षा राणीच्या भारतीय प्रजाजनांनाही दिली जावी.

हा एक प्रकल्पच बनला! म्हणजे एक समिती स्थापली गेली. वर्तमानापत्रांतून वगैरे साधक बाधक चर्चा झाली. समितीचा सचिव हरफर्ड याने प्रस्तुत कार्याचे काही फायदे असे नोंदले (१८८२) :

१) आपण व राणीचे पौर्वात्य प्रजाजन यामधील दरी अरुंद करता येईल.

२) राजभक्ती व्यक्त करण्याचे एक माध्यम या प्रजाजनांना उपलब्ध होईल. (होय, शब्द 'भक्ती' असाच वापरला गेला, 'निष्ठा' नव्हे! भारतीयांना भक्ती जवळची, निष्ठा नाही असा अभिप्राय होता का?)

३) राणीच्या व्यक्तिगत चारित्र्याशी नव्या प्रजाजनांचा परिचय वाढल्यामुळे भारतीय महिलांची सामाजिक प्रतिष्ठा वाढेल.

४) एकाच सर्वसामर्थ्यशील शक्तीला उद्देशून गायल्या जाणाऱ्या स्तोत्राच्या प्रचारामुळे वैदिक एकेश्वरीवादाच्या पुनःस्थापनेत मदत होईल.

५) संगीताची सामाजिक प्रतिष्ठा उंचावल्यामुळे आणि भारतीय व पाश्चिमात्य दृष्टीनेही संगीताची जोपासना करण्याचा पायंडा पाडल्यामुळे भारतीयांचे अशिष्ट वर्तन अधिक सौम्य होईल. पतितांच्या अभिरुचीत सुधारणा घडेल आणि सर्वसामान्य जनांचे नैतिक बल दुणावेल.

तमसेच्या तीरावर अशा घटना तर हुगळीच्या तटावर (व विशेषतः संगीत क्षेत्रात) काय काय चालले होते? - कारण दोन्ही बाजूंच्या घटना एकमेकांना प्रतिसाद देत देतच कालौघाची दिशा ठरत होती.

**टागोरांचे लेख**

१८६० पासून बंगालमधील हिंदू मेळ्यांत राष्ट्रवादी पदे गाइली जाऊ लागली होती. भारतीय संगीत लिहिता येते आणि तसे ते लिहावे याविषयी १८७४ पासून वाद सुरु झाले. मुद्दा काय ते समजून घेण्यासारखे आहे. पाश्चिमात्य संगीतकार जे जे करतात ते ते सर्व आम्ही करू शकतो या जिद्दीतून अनेक भारतीय संगीतकार आपापल्या संगीतलेखनपध्दती पुढे ठेवू लागले होते - भारताच्या सर्व प्रांतांत. हा राष्ट्रवाद नाही काय? महत्त्वाचे असे की, दुसरे काही संगीतकार याच मुक्कामावर येऊ पाहत - पण उलट बाजूने! त्यांच्या मते भारतीय संगीत लिहिता येणे शक्यच नाही इतके ते चांगले असते! असो. १८७५ मध्ये बंकिमचंद्रांना वंदे मातरम् स्फुरले. तर सौरीन्द्रमोहन टागोर (यांच्याविषयी नंतर अधिक) - यांनी दोन पुस्तके प्रसिद्ध केली. एक राजपुत्राला तर दुसरे राणीला अर्पण. पहिल्यात इंग्रजी पद्याला भारतीय संगीताचा साज चढविला होता. राणीला अर्पण केलेल्या पुस्तकात इंग्रजांच्या इतिहासावर वगैरे टागोरांचे लेख होते.

नवनिर्मित कलकत्यात दोन टागोर घराणी - थोरली व धाकटी पाती म्हणण्यासारखी. पाथुरिया घाट टागोरांचे वंशज सौरींद्रमोहन तर जोरासांको टागोरांचे रवींद्र. पहिले घराणे नवशिक्षित, श्रीमंत, ब्रिटिशांचे थोर उपकार मानणारे - पण तरीही सनातनी. रवींद्रांचे पैतृक घराणेसुध्दा नव्या शिक्षणाने संपन्न, श्रीमंत, ब्रिटिशांना परकीय मानणारे व आधुनिकतावादी. दोन्ही घराण्यांच्या कार्यांची विविधता व महत्ता स्तिमित करणारी. सौरींद्रानी संगीत हेच आपले कार्यक्षेत्र मानले होते. आपल्या दीर्घ आयुष्यात त्यांनी संगीतावर पुस्तके लिहिली, संगीत शिकवण्यासाठी शाळा काढल्या, संगीतकारांना आश्रय देऊन समारंभपूर्वक पदव्या इ. दिल्या, परदेशी विद्यापीठांना, संग्रहालयांना भारतीय वाद्ये बनवून घेऊन भेट म्हणून पाठविली. यामुळे मॅहिलोन (१८४१-१९२४) या अध्वर्यू वाद्यशास्त्रज्ञाला वाद्यवर्गीकरणाची नवी पध्दती - भारतीय संगीतशास्त्राच्या आधारे मांडणे शक्य झाले.खरे पाहता यंत्रकोश (१८७५) हे टागोरांचे पुस्तक पहिले आधुनिक वाद्यशास्त्रीय प्रकाशन मानायला हवे! याशिवाय भारतीय संगीताचे लेखन करून पाश्चात्त्य संगीताच्या तोडीस तोड प्रसारसाहित्य तयार करण्याची त्यांनी होड घेतली. भारतीय संगीत किती संपन्न, शास्त्रशुद्ध व श्रेष्ठ हे परकी राज्यकर्त्यांना पटविण्याचा आटोकाट प्रयत्न हेच त्यांच्या आयुष्याचे ध्येय होते. धर्मसंमत नाही म्हणून कधीही परदेशी न जाणाऱ्या सौरींद्रांना अनेक

परदेशी विद्यापीठे, राज्यकर्ते वगैरेंनी मानद पदव्या दिल्या. पाश्चिमात्य सांगीतिक नकाशावर भारतीय संगीताचा सवतासुभा निश्चितीने रेखण्यासाठी त्यांनी अविश्रांत धडपड केली. संगीतलेखनाबाबत त्यांची भूमिका वेधक. लेखन हवे, कारण तसे केल्याने आपण राज्यकर्त्यांना आपले श्रेष्ठत्व पटवू, पण त्यासाठी राज्यकर्त्यांचे स्टाफ नोटेशन मात्र वापरणार नाही, असा त्यांचा आग्रह होता! ही कामगिरी राष्ट्रवादी आहे की नाही?

**पं. यदु भट्ट यांची चाल**

अशा या सौरींद्रांची ब्रिटिश प्रीती राज्यकर्त्यांना मनोमन पटली होती. राणीचे स्तोत्र व नवे राष्ट्रगीत प्रसृत व्हावे म्हणून इंग्लंडमधल्या समितीने त्यांना नेमले (१८८२). त्यांनी धडाक्याने गीताला १२ निरनिराळ्या रागांत चाली दिल्या व त्या छापल्या! भारतीय शास्त्रानुसार वेगवेगळ्या वेळी गाण्यासाठी त्यांनी अशा चाली बांधल्या. तसेच कीर्तनशैली, देशी राग व अधिक भारदस्त राग यांचीही त्यांनी कटाक्षाने योजना केली, असे त्यांनी आवर्जून स्पष्ट केले. शिवाय संगीतनारायण (१७१८-१७६७) या ग्रंथाचा हवाला देत त्यांनी असेही सांगितले की, राष्ट्रगीत गंभीर, करुणेतून लीनतेकडे नेणारे व पूर्ण सप्तकाचा विस्तार ठेवणारे असावे. (जन गण मन चा विस्तार एका सप्तकाचा आहे!) राणीस्तोत्राचे विविध भारतीय भाषांत भाषांतर, यासाठी निधी गोळा करणे वगैरे पावले झपाट्याने उचलली जाऊ लागली. याच वर्षी (१८८२) बंकिमचंद्रांनी 'आनंदमठ' प्रकाशित केले. प्रस्तुत कादंबरीने वंदे मारतम् ला एक वेगळी झळाळी दिली हे सर्वज्ञात आहे. आणि तरीही १८८५ साली भरलेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात गायले गेले ते राणीचे स्तोत्र! हळूहळू राष्ट्रवादाचे स्वरूप पक्के होत होते, ब्रिटिशविरोधाची कडवी धार हे त्याचे लक्षण क्रमाक्रमाने नक्की होत होते हाच याचा अर्थ नाही काय? म्हणून बरेच विचारमंथन होऊन १८८६ च्या अधिवेशनात वंदे मातरम् गायले गेले! चाल दिली होती यदु भट्ट या प्रख्यात धृपद गायकाने. (हे रवींद्रांनाही गुरुस्थानी होते). पुढे १८९६ च्या अधिवेशनात रवींद्रांनी स्वतः वंदे मातरम् गायले. या गीताच्या वाटचालीतला महत्त्वाचा टप्पा असा की, १९०५ च्या वंगभंग चळवळीच्या वेळी या गीताला निषेधगीताचे सामर्थ्य लाभले! आता त्याची परिणामकारकता इतकी वाढली की ब्रिटिश राज्यकर्त्यांनी त्यावर बंदी घातली. १९०६ च्या काँग्रेसच्या अधिवेशनात हजारो कंठांनी ते गायले, तेव्हा या जमावावर लाठीहल्ला झाला! याच वर्षी वंदे मातरम् या नावाचे वृत्तपत्रही निघाले. खुदीराम हेच शब्द उच्चारत फासावर चढला. भगतसिंग, आझाद वगैरे क्रांतिकारकांनी वीरमरण स्वीकारताना याच शब्दांना आपला अंतिम तारणमंत्र मानले! १९११ साली काँग्रेसच्या अधिवेशनात जन गण मन पहिल्याने गायले गेले, तर प्रांतिक सरकारांनी १९३८ मध्ये वंदे मातरम् हेच आपले राष्ट्रगीत म्हणून स्वीकारले!

**गुणचिन्ह नव्हे, प्रतीक**

मुद्दा असा की 'गॉड सेव द क्वीन' हे ब्रिटीशांनी लादलेले राष्ट्रगीत, तर वंदे मातरम् हे ब्रिटीशांनी लादलेल्या राष्ट्रवादाने आवश्यक म्हणून सुरुवातीला राष्ट्रगीत असले तरी अनेकांच्या भावभावनांनी पुष्ट होत होत बनलेले संस्कृतिगीत! व्यापक आवाहन, सूचकता आणि संदिग्धता हे त्यांचे गुणचिन्ह न राहता ते प्रतीक बनले! म्हणून त्याला अनेकांनी अनेक चाली लावल्या. प्रत्येक चाल गीतावरचे स्वतंत्र (व आंतरिक ऊर्मींमुळे अनिवार्य) भाष्य असते! वंदे मातरम् वर भाष्ये करावीशी वाटली - प्रतीक गतिमान असते म्हणून. तर जन गण मनविषयी असा मोह पडला नाही - चिन्ह स्थिर असते म्हणून. मुळात अँन्थम म्हणजे केवळ प्रासंगिक (प्रसंगबद्ध म्हणायला हवे!) रचना होय. राष्ट्ररचना (गीत) हा एक त्याचा प्रकार. अर्थातच या प्रकारच्या गीतांचा आवाका संस्कृतिगीतांपेक्षा माफक व आवाहन तोकडे! वंदे मातरम् च्या सांस्कृतिक गतिमानतेचा आणि सांगीतिक बहुविधतेचा अन्वयार्थ न लावता आल्यामुळे बरेच गोंधळ माजले! अनेक वेळा गीतातले शब्द आणि त्याचे संगीत घटक निरनिराळ्या दिशांनी प्रवास करत असतात, त्यामुळे निर्माण होणारे ताण तीव्र असतात म्हणून खरे म्हणजे गीत अधिक परिणामकारी होत असते.

'वंदे मातरम्'ची विविध गायने/वादने तपासली तर काय आढळते? रवींद्रांचे गायन तीव्र, केशवराव भोळयांचे सांचेबंद नाटकी, पागनीसांचे सोपे व ठोस भजनी वळणाचे, मास्तर कृष्णरावांचे सामूहिक प्रसन्नतेस पोषक, अंभईकर-मोगूबाईंचे संयत पण असहज, दिलीपकुमार रॉय व सुब्बलक्ष्मी यांचे कारागिरीपूर्ण व बौध्दिक, हेमंतकुमार व लता यांचे केवळ चित्रपटीय (!), पं. भीमसेन व पं. जसराज यांचे फारच मुद्दाम, वसंत देसाई यांचे मागणीनुसार तयार केलेले, विश्वभारती व जगमोहन यांचे संचलनासारख्या ढोबळ कृतीत फसलेले, पं. ओंकारनाथ यांचे गंभीर व अंतर्मुख बनविणारे तर रहमान यांचे वातावरण निर्मितीत गुंतलेले - एक ना दोन!

राष्ट्रवाद बाहेरच्या दबावांनी तर संस्कृतिवाद यांच्यातल्या प्रेरणांनी आकाराला येतो - दोहोंना संगीताचा प्रतिसाद सारखा कसा असेल? विषयामुळे राष्ट्रीय(च) भासणाऱ्या, पण आशयामुळे सांस्कृतिक असणाऱ्या वंदे मातरम् चे पंख कापणे कशाचे लक्षण आहे? पारतंत्र्यातून सुटण्यासाठी राष्ट्रवाद लागला - आता राष्ट्रवादाचे आपण बंदी व्हावे काय? मला पडलेल्या प्रश्नांपैकी एक हा!

---